● शुक्रवार, दि ४ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ७३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282







शारदीय महोत्सवास गुरुवार (दि ३) पासून सुरुवात झाली आहे. घरोघरी घटस्थापनेसह मंडळांमध्ये देवीच्या विविधरुपी मुर्ती विराजमान झाल्या आहेत. मोठ्या उत्साहात वाजत गाजत शहरभरात मिरवणुकीचा जल्लोष दिसून आला. (छाया- किरण खानापुरे)

युवा आदर्श

## नऊ रंग ...

नवरात्र महोत्सव
नऊ रात्र नऊ रंग
दिस हे मंतरलेले
उल्हसित अंतरंग
नारी सह पुरुषही
एक रंग एक संघ
गरबा न् दांडियात
खेळात होतात दंग
वासनेचा ना स्पर्श
मन मोकळे उत्तुंग
अंगचट नको फुके
पोखरू नये रे भृंग
नर नारी न् नटेश्वर
स्वभावा उठे तरंग
गोपीसह निर्वासना
नाचे निर्मळ श्रीरंग
भेदा भेद विरघळे
गळूनि पडती व्यंग
नारीत पाहे देवीला
रे आपपर भावभंग
वृत्तीहवी निर्विकार
देवते समान अवंग
फायदे घेत गर्दीचा
नको ते अतिप्रसंग

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा झाडे जगवा**



# संपादकीय


## डान्सिंग स्टार

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना या वर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार हा कला क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार आहे. मिथुन चक्रवर्ती यांना जाहीर झालेला हा पुरस्कार म्हणजे त्यांनी आजवर केलेल्या अभिनय कलेचा गौरव आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी जवळपास पाच दशके चित्रपट सृष्टीत व्यतीत केले असून हिंदी, बंगाली सह अनेक भाषेत अभिनय केला आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत डान्सिंग स्टार म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म १६ जून १९५० रोजी झाला. बी एस सी चे शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्युटमध्ये प्रवेश घेतला. अभिनयाचे शिक्षण घेतल्यावर त्यांनी मृगया या बंगाली चित्रपटात अभिनय केला. मृगया या त्यांच्या पहिल्याच चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला. पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे देशभर नाव झाले. त्यांनीही मग हिंदी चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी मुंबई गाठली मात्र इथे त्यांना सहजासहजी चित्रपट मिळाले नाही. त्यांनाही चित्रपटात भूमिका मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. १९८२ साली आलेल्या डिस्को डान्सर हा त्यांचा तसा गाजलेला पहिला हिंदी चित्रपट. या चित्रपटाने त्यांना डान्सिंग स्टार बनवले पुढे हीच ओळख त्यांची कायम राहिली. त्यांनीही ही ओळख जपण्याचा प्रयत्न करत अनेक चित्रपटात अप्रतिम नृत्यकला सादर केली. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट हिट होत गेले. विशेषतः ८० च्या दशकात त्यांना अभूतपूर्व यश मिळाले. सुरक्षा, तराणा, हम पांच, शौकीन, वारदात, डिस्को डान्सर, प्यार झुकता नही, डान्स डान्स असे त्यांचे अनेक चित्रपट हिट झाले. तो काळ सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा होता. अमिताभ बच्चन यांनी नाकारलेले अनेक चित्रपट त्यांना मिळाले आणि त्यांनी त्यांचे सोने केले. त्यांच्याकडे चित्रपट दिग्दर्शक, निर्मात्यांची रांग लागू लागली म्हणूनच त्यांना गरीब दिग्दर्शकांचा अमिताभ असे म्हंटले जाऊ लागले. १९९० साली त्यांना अमिताभ बच्चन यांच्यासोबतच अग्निपथ चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे ही त्यांनी सोने केले. अमिताभ बच्चन यांच्यासमोर त्यांनी सशक्त अभिनय करून वाहवा मिळवली. ९० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांनी अनेक चांगल्या भूमिका केल्या मात्र ९० च्या उत्तरार्धात त्यांनी मिळेल त्या भूमिका स्वीकारल्या त्यामुळे त्यांचे अनेक चित्रपट फ्लॉप झाले. समीक्षकांनी त्यांना धारेवर धरले पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. उतार वयात मात्र ते चरित्र भूमिकांकडे वळले. वीर, गोलमाल ३, हाऊसफुल्ल २, ओह माय गॉड, खिलाडी ७८६, कांची, किक अशा चित्रपटातून त्यांनी चरित्र भूमिका साकारल्या. या भूमिकाही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. छोट्या पडद्यावरील डान्स इंडिया डान्स या नृत्यावर आधारित कार्यक्रमात त्यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांना तीन राष्ट्रीय, दोन फिल्मफेअर, दोन स्टार डस्ट व एक स्क्रीन अवॉर्ड मिळाला. आता त्यांना दादासाहेब फाळके हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा योग्य गौरव झाला असे म्हणावे लागेल. अर्थात त्यांना मिळालेल्या या पुरस्कारावरही काहींनी आक्षेप घेतला आहे. मिथुन चक्रवर्ती हे सत्ताधारी पक्षाचे समर्थक असल्याने त्यांना हा पुरस्कार दिला गेला असा आक्षेप घेतला जात आहे. अर्थात आक्षेप घेणारेही त्यांच्या अभिनय कलेचे प्रशंसक आहेत हे देखील तितकेच खरे आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## परखड वाचास्पती नितीन गडकरी

निवडणुका जवळ आल्या की, राजकीय नेत्यांपासून ते गल्लीतल्या चेल्याचपट्यापर्यंत सर्वांचीच पोपटपंची सुरु होते.



एकमेकांची राजकीय असो वा वैयक्तीत उणीदुणी काढून राजकीय कंड शमवण्याचा प्रकारामुळे जनतेमध्ये आपले लोकप्रतिनिधी किती हीन विचाराचे आहेत ह्याचे दर्शन होते.त्यात काही नेते हे राष्टहीताचा विचार करून आपली मते जाहीरपणे मांडतात त्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आघाडीवरआहेत. गडकरी हे अजातशत्रू आहेत असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. त्यांच्या निस्वार्थ कामाचा डंका देशभर गाजतो.जाहीर सभांतून ते आपली मते रोखठोकपणे मांडताना पक्षातील चुकीच्या निर्णयाचा पर्दाफाश करताना एक गोष्ट कळत नाही कि, गडकरी साहेब हेच विचार मंत्रिमंडळाच्या किव्वा पक्षाच्या बैठकीत मांडतात आणि त्याला केराची टोपली दाखवली जात असेल म्हणून कदाचित गडकरी राष्ट्रहित पाहता उघडपणे बोलत असावेत.मोदी आणि गडकरी यांचे वैचारिक मतभेद असावेत म्हणून काही समारंभात गडकरी हे इतर मंत्री,नेत्यासारखे लाजिरवाणे हात जोडून मोदी यांचा नमस्काराचा स्वीकार करतात असे कधी दिसले नाही.केंद्र व राज्य सरकारने निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विविध योजना जनतेला आकर्षित कि,लाचार वा मतांची बेगमी करण्यासाठी केलेली आर्थिक उलथापालथ हि देशाला राज्याला भविष्यात घातक आहे.उद्योगाचे अनुदान अधांतरी राहणार,म्हणून कोणतेही शासन हि विषकन्या आहे उद्योजगांनी भरवश्यावर राहू नये हि केलेली सूचना व शासनाला विषकन्या म्हणणे ह्यामागे नितीन गडकरी हे सावध करतात ते योग्यच आहे.नितीन गडकरी यांनी सरकारला जाहीर कानपिचक्या दिल्या त्याचा प्रसारमाध्यमांनी स्वागत करायचे सोडून नितीन गडकरी यांनी केंद्र राज्य सरकारला घरचा आहेर दिला असे हिणवून टीआरपीसाठी त्यांची निर्भत्सना करतात हे प्रसारमाध्यमांसाठी नेहमीप्रमाणे लाजिरवाणीच गोष्ट आहे.नितीन गडकरीप्रमाणे भाजप वा अन्य पक्ष असो,जे स्वाभिमानी राष्ट्रहित जपणारे लोकप्रतिनिधी आहेत अश्यानी देश आर्थिक,सामाजिक,राजकीय,धार्मिक संकटात सापडणार नाही ह्यासाठी आपला विरोध जाहीरपणे पक्षात व बाहेर मांडला पाहिजे.

**यशवंत चव्हाण सीबीडी, बेलापूर.**

### तामिळनाडू सरकारला हिंदु जनजागृती समितीचा प्रश्न

# ईशा फाऊंडेशनच्या आश्रमावर धाड टाकली, तशी धाड चर्च आणि मदरसे यांवर कधी टाकणार ?

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** मद्रास उच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर सद्गुरु जग्गी वासुदेव यांच्या कोईंबतूर येथील 'ईशा फाऊंडेशन'च्या आश्रमात पोलिसांनी धाड टाकली. दोन सज्ञान मुलींनी संन्यासदीक्षा घेतली, म्हणून त्यांच्या वडीलांनी 'हेबियस कॉर्पस' केस दाखल केली होती. या वेळी तामिळनाडूतील स्टॅलिन सरकारने सुमारे १५० पोलिसांचा फौजफाटा आश्रमात पाठवला होता. एखाद्या मुलीने संन्यासआश्रम स्वीकारला म्हणून इतका मोठा फौजफाटा? या प्रकरणी संपूर्ण आश्रमाची ज्याप्रमाणे तपासणी केली गेली, अशी तपासणी कधी कोणत्या चर्च आणि मदरसा यांमध्ये धाड टाकून स्टॅलीन सरकारने केली आहे का, असा प्रश्न हिंदु जनजागृती समितीने विचारला आहे. तामिळनाडूचे 'स्टॅलिन सरकार' हे सनातन धर्म विरोधी असल्यानेच अशी कारवाई केली गेली. हिंदुबहुल देशात हिंदूंच्या आश्रमांवर संन्यास घेतल्याबद्दल धाड टाकली जाते, हे अतिशय निंदनीय असून हिंदु जनजागृती समिती या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करते.

सद्गुरु जग्गी वासुदेव आणि त्यांची 'ईशा फाऊंडेशन' सामाजिक, राष्ट्रीय आणि आध्यात्मिक क्षेत्रात मोठे योगदान देऊन भारताचे नाव विश्वभरात मोठे करत आहे. या फाऊंडेशनद्वारे देशभरात समाजहितासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. अशा संस्थांवर त्या जणू अतिरेक्यांचा अड्डा असल्याप्रमाणे धाडी घातल्या जातात, हे संशयास्पद असून हा हिंदु संस्थांची समाजात हेतूतः बदनामी करण्याचा प्रयत्न आहे, असे समितीने म्हटले आहे.

नुकतेच १४ वर्षाच्या मुलीवर जवळपास दोन वर्षे अत्याचार करणार्या रघुराजकुमार नावाच्या पाद्र्याला पोक्सो कायद्याअंतर्गत तक्रार नोंदवूनही महिनाभर तामिळनाडू पोलिसांनी काहीच कारवाई केली नाही आणि तो पाद्री फरार झाला. एकीकडे अल्पवयीन मुलीवर दोन वर्षे इतका अत्याचार होऊनही पोलिसांची उदासीनता आणि दुसरीकडे सज्ञान मुलीने स्वखुशीने संन्यास स्वीकारला, म्हणून आश्रमात १५० पोलिसांची धाड ! यातूनच तामिळनाडू सरकारचा सनातन हिंदु धर्माचा द्वेष आणि ख्रिस्ती लांगुलचालन स्पष्ट होते. यासह 'सायरो मलंकारा कॅथोलिक चर्च'चे पाद्री बेनेडिक्ट अँटो यांच्यावर महिलांवर अत्याचार केल्याचा आरोप झाला होता. तामिळनाडूमध्ये ख्रिस्ती पाद्र्यांकडून महिलांचे



लैगिक शोषण झाल्याच्या अनेक घटना उघडकीस येत आहेत; मात्र तामिळनाडू सरकारने अशा किती चर्चसंस्थांवर धाडी घातल्या? सनातन धर्माला डेग्यू, मलेरिया यांची उपमा देऊन सनातन धर्म संपवण्याची भाषा करणार्या तामिळनाडूतील स्टॅलीन सरकार आणि द्रविड मुनेत्र कळघम (डी.एम्.के.) पक्षाकडून आणखी काय वेगळी अपेक्षा करणार ? त्यामुळे ईशा फाऊंडेशनवर झालेल्या द्वेषपूर्ण कारवाईच्या प्रकरणाची केंद्र सरकारने चौकशी करावी, अशी मागणीही समितीने केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मराठवाडा शिक्षक संघाचे आज लक्षवेधी आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** माऊंट कार्मेल कॉन्व्हेंट उच्च माध्यमिक शाळा जि. चंद्रपूर या शाळेचे आदानी फाउंडेशन, अहमदाबाद या संस्थेस हस्तांतरण बाबतच्या शासन निर्णया विरोधात व श्री. एम. एस. जैन इंग्लिश स्कूल बंद करण्याच्या व्यवस्थापनाच्या निर्णयाविरुद्ध - शाळा वाचवा ! देश वाचवा!! मोहिमे अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत मराठवाडा शिक्षक संघ, जळणाच्या वतीने लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे शासनाने नुकतेच काढलेल्या आदेशानूसार २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळेवरून नियमित शिक्षकाची बदली करून त्या जागेवर कंत्राटी शिक्षक नेमण्याचा घाट घातला आहे. नव्हे तसा शासनादेश सुद्धा काढला आहे. आणि त्याची अंमलबजावणी लगेचच होणार असून त्यामुळे अशा शाळेवरच्या नियमित शिक्षकाची बदली केल्यास बरेच शिक्षक अतिरिक्त होण्याची शक्यता आहे. याच कारणाने मराठवाडा शिक्षक संघाने या बाबीची गंभीर दखल घेऊन शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध व शासनाच्या कंत्राटीकरण धोरणाच्या विरोधात जोरदार आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनासाठी जिल्हाभरातून सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा सचिव संजय येळवंते यांनी केले आहे.कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षक, शिक्षण आणि शिक्षणाशी संबंधित घटकांची स्थिती यावर अवलंबून असते. ज्या देशांनी शिक्षणास उच्च प्राधान्य दिले ते देश जगात महासत्ता म्हणून उदयास आले आहेत. महाराष्ट्र राज्य प्रगत आणि पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. फुले,शाहू आंबेडकर यांनी रयतेच्या दुःखाचे कारण केवळ अज्ञान असल्याने त्यांनी सर्वांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. कर्मवीर भाऊराव पाटील,पंजाबराव देशमुख ,कर्मवीर मामासाहेब जगदाळे,कर्मवीर महर्षी धोंडो केशव कर्वे ,शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे यांनी शेवटच्या माणसापर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी जीवाचे रान केले. परंतु वर्तमान सरकारने हे धोरण उलटे फिरवून शिक्षणाची दारे गोरगरीब, कष्टकरी,शेतमजूर कामगार यांच्या मुलांना शाळेची दरवाजे बंद करण्याचा घाट घातला आहे. त्यामुळे हे शिक्षणाचे खाजगीकरण, कंपनीकरण, कंत्राटीकरण या विरोधात एकीची वज्रमुठ आवळून हे निर्णय रद्द करून आपले आणि आपल्या भावी पिढ्याचे भवितव्य वाचवण्यासाठी २७/९/२०२४ व १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा शासन निर्णय त्याच पद्धतीने व्यवस्थापनाने दिलेला आदेश रद्द करण्यात यावा यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज दि ४ ऑक्टोबर २०२४ वार शुक्रवार वेळ दु ४ ते ६ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय जालना या ठिकाणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलनासाठी जिल्हाभरातील सर्वच क्षेत्रातील शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी,पालक यांनी सहभाग नोंदवून आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी स्वीकारला पदभार

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून गणेश महाडिक यांनी आज पदभार स्वीकारला जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेवून श्री. महाडिक यांनी आज निवासी उपजिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारला.

यापूर्वी श्री महाडिक यांनी सन २०११ ते २०१७ या कालावधीत सिंधुदूर्ग येथे परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. तर सन २०१७ ते २०२० या कालावधीत त्यांनी परळी येथे उपविभागीय अधिकारी तर सन २०२० ते २०२४ या कालावधीत लातूर येथे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन), तसेच हिंगोली येथे जानेवारी ते ऑकटोबर २०२४ मध्ये उपजिल्हाधिकारी (रोहयो) म्हणुन काम केले आहे.



पदभार स्वीकारल्या नंतर श्री. महाडिक म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना पोचविण्याचा प्रयत्न करणार आहे.

## सिद्धार्थ महाविद्यालयात वाणिज्य व नियोजन मंडळ व सामाजिक शास्त्र मंडळांचे उदघाटन

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** सिद्धार्थ महाविद्यालयात वाणिज्य व नियोजन मंडळ तथा सामाजिक शास्त्र मंडळांचे उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाच्या प्रसंगी उद्घाटक




म्हणून लाभलेले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील डॉ. कैलास त्रिभुवन हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते व प्रा.डॉ. मोहन वने हे देखील उपस्थित होते वाणिज्य व नियोजन मंडळ व सामाजिक शास्त्र नियोजन मंडळाचे उद्घाटन पर भाषणामध्ये विद्यापीठातील शैक्षणिक विभागाचे डॉ. कैलास त्रिभुवन म्हणाले की, प्रत्येक महाविद्यालयामध्ये वाणिज्य व नियोजन मंडळाचे उद्घाटन करणे गरजेचे आहे.या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाणिज्य व नियोजन मंडळ व सामाजिक शास्त्र मंडळ विषयी विद्यार्थ्यांना माहिती मिळते ते पुढे म्हणाले की आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये वाणिज्य शाखेला मोठी मागणी प्राप्त झालेली आहे कारण वाणिज्य शाखेच्या माध्यमातून विविध प्रकारचे उद्योजक तथा उद्योग उभे राहिले जातात. व एक उद्योजक अनेक व्यक्तींना रोजगार निर्माण करून देत असतो त्यामुळे अनेक बेरोजगार तरुणांना रोजगार प्राप्त होते. अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. मोहन वने म्हणाले की विद्यार्थ्यांनी दररोज कॉलेजमध्ये उपस्थिती राहुन महाविद्यालयातील विविध सुविधाचा फायदा घ्यावा. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेकडे लक्ष दिले पाहिजे महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्र उपलब्ध आहे या संधीचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र. तु. देशमुख म्हणाले की, सध्याच्या स्थितीमध्ये वाणिज्य शाखेमध्ये विविध प्रकारच्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. संजय साळवे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.डॉ. मनोज पगारे यांनी केले व आभार प्रदर्शन प्राध्यापिका मनियार एस .आर. यांनी केले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण पथकाची शहरात कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील विविध ठिकाणी अवैधरित्या गुटखा, तंबाखु, मावा, जर्दा, खर्रा आणि सुट्टे सिगारेट इत्यादींची विक्री करणाऱ्या तसेच तंबाखु नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व पान टपरीधारकांवर कोटपा-२००३ कायद्यातंर्गत जिल्हा तंबाखु नियंत्रण अंमलबजावणी पथकाद्वारे छापे टाकण्यात आले. कोटपा कायद्याअंतर्गत एकुण १७ पानटपरीवर कारवाई करुन ४ हजार ६०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी दिली आहे.

जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, अतिजिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पानटपरी धारकांनी अवैधरित्या कुठल्याही तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करु नये, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

### त्रिकुटा मातेच्या भक्तांचा ३०० किलोमीटर पायी प्रवास

# तुळजाभवानी मातेची ज्योत टेंभुर्णीत



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णीसह पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या येथील त्रिकुटा माता मंदिरावर नवरात्रोत्सवाची तयारी जोमात सुरू झाली आहे. यंदाही प्रथमच या मंदिरासमोर संपूर्ण नवरात्र तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीची मशाल ज्योत तेवत राहणार आहे. ही ज्योत आणण्यासाठी त्रिकुटा माता भक्तपरिवारातील २१ जणांचा समूह तुळजापूरहून टेंभुर्णीकडे रवाना झाले. या मातेचे हे भक्त ३ दिवसांत ३०० किलोमीटरचे अंतर पायी चालून ही ज्योत टेंभुर्णीत घेऊन आले आहेत. यासाठी सोमवारी तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरातून या भाविकांनी हातात पेटती मशाल घेऊन टेंभुर्णीकडे प्रस्थान केले. यात दिवस-रात्र धावून हे भक्त मशाल घेऊन चालत दिवस-रात्र मिळून ते दररोज १०० किलोमीटरचे अंतर पार करत पहिल्या माळेला गुरुवारी पहाटे हे भाविक येथील त्रिकुटा माता मंदिरावर पोहचले.

**नऊ दिवस निघते मशाल रॅली**

येथील प्रसिद्ध असलेल्या त्रिकुटा माता मंदिरावर दरवर्षी नवरात्रोत्सवात नऊ दिवस पहाटे गावातून मशाल रॅली काढली जाते. यात महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. आळीपाळीने मशाल हाती घेऊन धावतात, तर इतर भाविक सोबत असलेल्या गाडीत बसून हे अंतर पार करीत.

**भाविकांची इच्छा पूर्ण**

महाराष्ट्रातील कुलदैवत असलेल्या तुळजापूरच्या तुळजाभवानी देवीची ज्योत त्रिकुटा माता मंदिरावर आणावी, ही भाविकांची अनेक दिवसांची इच्छा होती. यंदा मातेच्या कृपेने आमची ही इच्छा पूर्ण होत आहे. याचा आनंद वाटतो. ज्योत घेऊन धावताना भाविकांच्या पायांना फोड येत आहेत. मात्र, यातून मिळणारे समाधान है त्यापेक्षा कितीतरी पटींनी मोठे आहे. जे आम्ही शब्दांत व्यक्त करू शकत नाही अशी प्रतिक्रिया टेंभुर्णीतील माता भक्त विलास कुमकर यांनी दिली.

**नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक**

टेंभुर्णीच्या ग्रामदैवत रेणुका माता मंदिर येथे ज्योतीचे गावातील मिरवणूक नंतर आगमन झाले तेथील विश्वास त्यांनी या मशाली ज्योतचे विधीवत पूजन केले. व सर्वांनी आरतीने तिचे स्वागत करून. विलास कुमकर यांचे यांचे स्वागत केले. याप्रसंगी, संस्थांचे अध्यक्ष देशमुख, संस्थांचे सचिव प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, उपाध्यक्ष गंगाराम धनवाई, ठामजी जी भागवत, रामराव जमदाडे, कमलताई देशमुख, सुरेश शिराळे, आशाताई गुरव, विश्वनाथ सांगोळे सर, सुनील देशमुख, आबाराव देशमुख, सरस्वतीबाई देशमुख, माजी सरपंच लक्ष्मणराव शिंदे, कैलास देशमुख, किसन जोशी सखुबाई कांबळे, रमेश जाधव लक्ष्मणखताळ, सचिन जाधव, अविनाश देशमाने, मनोहर घोडके,बाळू देशमुख, महादू भागवत,ग्रामपंचायत सदस्य किशोर कांबळे, गायक दगडोबा उखर्डे, तानाजी उकर्डे, मनोज पंडित, तसेच त्रिकुटा माता सोबतचे २१ भाविक भक्त उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या फोन नंतर पोलिस अधीक्षकांनी जालन्यात डिजे वाजवण्यास दिली परवानगी

## शिवसेना युवानेते अभिमन्यू खोतकर यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्र्यांच्या फोन नंतर जिल्हा पोलिस अधीक्षकांनी जालन्यात डिजे वाजवण्यास परवानगी आज दिनांक ३ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान दिलीय. नियमांच्या चौकटीत राहून जालन्यात नवरात्र उत्सवात रात्री १० वाजे पर्यंत डिजे वाजवण्यास परवानगी देण्यात आलीय. डीजेच्या कर्कश आवाजामुळे सर्वसामान्य नागरिक आणि वृद्ध नागरिकांना त्रास होतो. त्यामुळे खबरदारी म्हणून यंदा डीजे वाजवण्यास बंदी घालण्यात आली होती. मात्र युवकांचा डीजे वाजवण्याचा हट्ट असल्याने जालना शहरातील काही युवकांनी शिवसेना युवा नेते अभिमन्यू खोतकर यांची भेट घेत त्यांना जालन्यात डीजे वाजवण्यास पोलिसांकडून परवानगी मिळवून द्यावी अशी विनंती केली. त्यानुसार अभिमन्यू खोतकर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी मा अनंत कुलकर्णी व सदर बाजार पोलिसांची भेट घेत त्यांच्याकडे जालन्यात डीजे वाजवण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केली. यावेळी शिवसेना नेते माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि जालन्याचे पोलिस अधीक्षक यांचा फोन वरून संवाद घडवून आणला. अखेर नियमांचे पालन करून जालन्यात डीजे वाजवण्यास पोलिसांनी परवानगी दिली असल्याची माहिती शिवसेना युवानेते अभिमन्यू खोतकर यांनी दिलीय. यावेळी अर्जुन खोतकर समर्थक शेख नजीर माजी नगरसेवक महेश दुसाने गोपाल काबलिया अभिजीत काबलिया यासह डीजे चालक व शिवसेना युवा सेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



# दिपावली सणानिमित्त फटाके परवान्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** दिपावली सणानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी फटाका विक्री होत असते. विस्फोटक नियम २००८ मधील कलम ८४ अन्वये तात्पुरता फटाका विक्री करण्याचे परवाने निर्गमित होत असतात. तात्पुरता फटाका विक्री परवान्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयात मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होत असतात. तरी तात्पुरता फटाका विक्री, नुतनीकरण व नवीन तात्पुरता फटाका परवान्यासाठीचा अर्ज दि. १० ऑक्टोबर २०२४ पर्यंत अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयास सादर करावेत. असे आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.



दिपावली सणानिमित्त तात्पुरते परवाने विहीत मुदतीत देणे सुलभ व्हावे यासाठी यावर्षी फटाका परवाना देतांना विहीत पध्दतीने काम करण्यात येत असते. फटाका विक्री परवान्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज, परवाना धारकाचा फोटो, पॅन कार्ड (अनिवार्य), मतदान ओळखपत्र/ फोटो असलेला कुठलाही पुरावा, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, अजिविका व नोकऱ्यावरील कर अधिनियम १९७५ नुसार व्यवसाय कर अधिकारी यांच्याकडील नादेय प्रमाणपत्र, आयुक्त तथा प्रशासक जालना महानगर पालीका/मुख्याधिकारी नगर परिषद, नगरपंचायत, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे स्थळदर्शक नकाशासह ना हरकत प्रमाणपत्र, नवीन परवाना धारकांसाठी संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्रासह नाहरकत आदि कागदपत्रे आवश्यक आहेत. तसेच सर्व कागदपत्रे सादर केल्यानंतर नियमाप्रमाणे परवाना शुल्क, नुतनीकरण शुल्क शासन जमा करण्यासाठी शासकीय चलन देण्यात येईल. तसेच सर्व तात्पुरता फटाका विक्री परवाने वेळेत देण्यात येतील. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# जालना ते छ. संभाजीनगर; मातंग समाजाचा मोर्चा

## उपवर्गीकरणाच्या अमंलबजावणीसाठी समाज आक्रमक



**जालना । प्रतिनिधी -** अनुसूचित जाती जमातीच्या उपवर्गीकरणाच्या अमंलबजावणीसाठी मातंग समाज आक्रमक झाला असून येत्या ४ तारखेला लाँग मार्च काढण्यात येणार आहे.

बुधवार (दि २) रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास एका हॉटेल येथे मातंग समाजाच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन माहिती देण्यात आली.

सुप्रीम कोर्टाच्या दवेंदर सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब सिव्हिल केस मध्ये ७ जजेसच्या खंडपीठाने अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची अमंलबजाणी करण्याच्या सूचना राज्याला दिली होती. मात्र अद्याप राज्य सरकारनं याबाबत कुठलेही पाऊल उचलेले नाही. त्यामुळं जालना ते संभाजीनगरपर्यंत मातंग समाज आणि ईतर अनुसूचित जातींना घेऊन पायी मोर्चा काढण्यात येणार आहे. येत्या ४ तारखेला शहरातील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात होणार असून ७ तारखेला संभाजीनगरला धडकणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालयावर या मोर्चाची सांगता होणार असून अनुसूचित जाती जमातीच्या उपवर्गीकरणाची तात्काळ अमंलबजावणी करावी अशी मागणी करण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेचा विषय हा १ ऑगस्ट २०२४ च्याअनुसूचित जाती व जनजाती आरक्षणामध्ये ऊपवर्गिकरण संदर्भात मा. सुप्रीम कोर्टाच्या दवेंदर सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब सिव्हिल अपिल क्रमांक २३१७/२०११ मध्ये ७ जजेसच्या खंडपिठाचा निकाल व त्या निकालाची मा. सुप्रिम कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने त्वरित अनुसूचित जातीच्या ऊपवर्गिकरणाची अंमलबजावणी करावी. यासाठी दिनांक ४ ऑक्टोंबर २०२४ ते ७ ऑक्टोंबर २०२४ च्या दरम्यान आरक्षण क्रांती पदयात्रा जालना ते छत्रपती संभाजीनगरला जाणार आहे. या पदयात्रेचा मुख्य उद्देश हा आहे की, मातंग समाज हा महाराष्ट्रात गेली ३५ वर्षे अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये ऊपवर्गिकरण व्हावे यासाठी संघर्ष करत आहे.

अशातच २००४ च्या ई. व्ही चन्नया विरुद्ध स्टेट ऑफ आंध्र केस मधिल जस्टिस हेगडे खंडपिठाच्या निकालामुळे वंचित जातींचे २० वर्षे न्यायापासून दूर गेलेआहेत. तरी देर आय दुरुस्त आए या उक्तीप्रमाणे १ ऑगस्ट २०२४ रोजी मा. सुप्रीम कोर्टाने राज्यांना ऊपवर्गिकरण करता येते असे निर्देश दिले आहेत व ३४१ (१) व (२) या अनुछेदानुसार राज्यसरकारला आरक्षणाचे वर्गीकरण करता येते यामध्ये कुठेही ३४९ (१) व (२) चे उल्लंघन होत नाही. तसेच आर्टिकल १५ (४) व १६ (४) प्रमाणे राज्यांना अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये अपर्याप्त प्रतिनिधित्व संदर्भात राज्यांना अधिकार आहे, असा वंचित घटकाच्या उद्धारासाठी महत्वपूर्ण ऐतिहासिक निकाल दिलेला आहे.

म्हणून महाराष्ट्र सरकारने यासंदर्भात आजून पाहिजे तसी मा. सुप्रीम कोर्टाच्या निकालाच्या अनुषंगाने भुमिका घेतली नाही. त्यामुळे या संदर्भात शासनाला जागे करण्यासाठी व मा. सुप्रीम कोर्टाच्या आरक्षण उपवर्गीकरण निर्देशाचे तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने मराठवाड्यातील मातंग व ईतर वंचित समाजाच्या वतीने जालना येथून दिनांक ४ ओक्टोंबर २०२४ पासून आरक्षण क्रांती पदयात्रा विभागीय आयुक्त कार्यलय संभाजीनगरकडे हा अतिमहत्वाचाविषय घेऊन या विषयाची गांभीर्यता सरकारच्या लक्षात यावी म्हणुन निघत आहे.

हि आरक्षण क्रांती पदयात्रा जालना साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे स्मारक उड्डाणपूल येथुन ४ ऑक्टोंबर रोजी सुरु होऊन ७ ऑक्टोंबर रोजी तिचे रुपांतर क्रांती चौक संभाजीनगर येथे मोच्र्यात होईल व तिथुन हा मौचर्चा आयुक्त विभागीय कार्यालय संभाजीनगर येथे सभेत रुपांतर होईल.

यावेळी मातंग समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्याच्या मेडिकल कॉलेजचा कॅपराऊंडमध्ये समावेश

जालना । प्रतिनिधी - येथील वैद्यकीय महाविद्यालयाचा शासनाच्या विद्यार्थी प्रवेश प्रक्रिये अंतर्गत कॅपराऊंड मध्ये समावेश झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्रातील भाजपाप्रणित सरकारने डब्ल्यूएचओच्या रिपोर्टनूसार डॉक्टरांची कमी झालेली संख्या लक्षात घेता देशभरात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकिय महाविद्यालय सुरु करण्याचा मानस केला होता. त्याच्या पहिल्या टप्प्यात देशभरात जवळपास १२४ वैद्यकिय महाविद्यालयांना मंजुर देण्यासह सुरु करण्याची प्रक्रिया केंद्र सरकारने सुरु केली होती. यात महाराष्ट्रात १४ जिल्ह्यात वैद्यकिय महाविद्यालये सुरु होत आहे. जालना येथेही शासकीय महाविद्यालय या वर्षापासून सुरु होत आहे. या महाविद्यालयासाठी जालन्यातील राजकीय नेत्यांनी मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला. केंद्रात माजी खा. रावसाहेब दानवे यांनी आपले वजन वापरत प्रयत्न केले. राज्यात महायुतीचे अर्जुनराव खोतकर राज्यात सत्ता असल्यामुळे याचा पाठपुरावा केला. जालना विधानसभेचे आमदार कैलास गोरंट्याल यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करत, वेळप्रसंगी उपोषण करत जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे यासाठी मागील चार वर्षापासून प्रयत्न केले. यासर्वांच्याच सामुहिक प्रयत्नांना अखेर यश आल्यानंतर जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रवेश प्रक्रिये अंतर्गत शासनाच्या कॅपराऊंड मध्ये समावेश करण्यात आला आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची वेबसाईट घोषित केली असून त्यात जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव अनुक्रमांक ३९१ वर असून त्यात जालन्याचा कोड क्रमांक ९०३३६४ असा आहे. शुक्रवार (दि ४ ऑक्टोंबर) पासून ही वेबसाईट विद्यार्थ्यांसाठी खुली होणार असल्याचे आ. कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.



या वेबसाइट वर महाविद्यालय निहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता दिसणार आहे. या प्रवेश प्रक्रियेत केंद्र शासनाचा प्रवेशाचा कोटा १५ टक्के तर राज्य सरकारचा कोटा हा ८५ टक्के इतका असतो. ही प्रवेश प्रक्रिया राबवतांना विद्यार्थ्यांचा पसंतीक्रम नोंदविण्यात येणार असून त्यांची गुणवत्ता व पसंतीक्रम यानुसार प्रवेश निश्चित होईल व त्यानंतर आठ दिवसात महाविद्यालयात विद्यार्थी येण्यास सुरुवात होईल. दरम्यान, जालन्यात नव्याने सुरू होत असलेल्या या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा जालना शहरासह जिल्हा व परिसरातील सर्वसामान्य जनतेला मोफत उपचारासाठी आणि वैद्यकीय संशोधनासाठी मोठी मदत होईल असा विश्वास आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.

# डॉ गोविंद भताने यांनी घेतली माजी राष्ट्रपती कोविंद यांची भेट



**दिल्ली -** भारताचे माजी राष्ट्रपती श्री.रामनाथजी कोविंद यांची डॉ गोविंद भताने यांनी १२ जनपथ दिल्ली येथे त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली, या भेटीदरम्यान विविध विषयांवर सुमारे ४५ मिनिटे सविस्तर चर्चा झाली, यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील विविध समस्या व मागण्या तसेच विशेष डेंटल डॉक्टरांच्या मागण्या संदर्भात चर्चा झाली, माजी राष्ट्रपती श्री.रामनाथ कोविंद यांनी सर्व विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ गोविंद भताने यांनी त्यांच्या सर्व वैद्यकीय, सामाजिक, राजकीय व इतर कामांची माहिती माजी राष्ट्रपती यांना दिली, या भेटीदरम्यान विविध मुद्यांवर सखोल चर्चा झाली व डॉ गोविंद भताने यांचे श्री.रामनाथ कोविंद यांनी कौतुक केले व पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्यस्तरीय ज्युनीयर टेनिक्काईट स्पर्धेसाठी निवड चाचणीचे आयोजन

**जालना । प्रतिनीधी -** महाराष्ट्र टेनिक्काईट असोसिएशनच्या वतीने दिनांक ७ ते ९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान पंढरपुर जि. सोलापुर येथे ज्युनीयर राज्य टेनिक्काईट अजिंक्यपद स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्याकरीता जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशनच्या वतीने दिनांक ७ ऑक्टोंबर २०२४ सोमवार रोजी निवड चाचणीचे आयोजन शिशु विहार इंग्लिश स्कुल, जालना येथे सकाळी १० वाजल्यापासुन करण्यात आलेले आहे.



सदर निवड चाचणीमध्ये सहभागी होणार्या खेळाडुंचा जन्म दि. ०१/०४/२००६ या नंतरचा असावा. निवड चाचणीत सहभागी होण्याकरीता कोणतेही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. सदर निवड चाचणीतुन ६ मुले व ६ मुलींची निवड करण्यात येईल व हे खेळाडु राज्यस्तर स्पर्धेत जालना जिल्ह्याचे नेतृत्व करतील. टेनिक्काईट हा खेळ शालेय स्पर्धांमध्ये सहभागी असुन दहावी व बारावीत असणार्या खेळाडुंना ग्रेस मार्क तथा शासकीय व निमशासकीय आरक्षणास पात्र आहे.

अधिक माहितीकरीता संघटनेचे सचिव शेख चाँद पी.जे. मो.नं. ९८२२४५६३६६, जिल्हा प्रशिक्षक उमेश खंदारकर, गोवर्धन वाहुळ, तुषार गर्जे, अमोल सातपुते, संतोष वाघ, नितीन जाधव, शेख समीर, सोहेल खान, श्रीमती किरण पाटील, यांच्याशी संपर्क साधावा. तरी सदर सुवर्ण संधीचा जालना जिल्हयातील खेळाडुंनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा टेनिक्काईट असोसिएशन जालनाचे अध्यक्ष नगरसेवक जयंत भोसले, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, देवगिरी विद्या प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बबन दादा सोरटी, क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेसी, सुभाष पारे, श्रीमती सुनीता गवई, श्रीमती वैशाली सरदार, श्रीमती महेजबीन शेख, श्रीमती गिता संगम जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशन जालना व जालना जिल्हा ऑलम्पीक असोसिएशन यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांनी आपली आवड जोपासून जीवनामध्ये आनंद निर्माण करावा - प्रा. बडवणे

**जालना । प्रतिनिधी -** समाजातील सर्व तरूण-तरुणीमध्ये आपल्या वडिलधाऱ्या ज्येष्ठ नागरिकांविषयी सहानभुती असणे आवश्यक आहे. ज्येष्ठांच्या समस्याविषयी जनजागृती करून देण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा केला जात असतो. तरी ज्येष्ठ नागरिकांनी आपली आवड जोपासून जीवनामध्ये आनंद निर्माण करावा, असे प्रतिपादन समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रा. रेणूका बडवणे यांनी केले.

जालना समाज कल्याण विभागाच्यावतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस कार्यक्रमाचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख तर प्रमुख पाहूणे म्हणून जालना ज्येष्ठ नागरिक मंचाचे महासचिव धर्मा खिल्लारे, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत कंकाळ, प्रा. मधुकर जोशी, बाबुराव सतकर यांच्यासह सहायक आयुक्त अनंत कदम, सहायक लेखाधिकारी गुलाब चव्हाण आदिची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सूरूवात महापुरूषांच्या प्रतिमेचे पुजन व उपस्थितांचे स्वागत करून झाली. त्यांनतर प्रा. मधुकर जोशी यांनी ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या विषयी माहिती सांगून त्याबाबत समाजामध्ये जनजागृती करून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे नमुद केले. श्री. कंकाळ यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी शहरामध्ये विरंगुळा केंद्र उभारण्याबाबत महापालिका प्रशासनाला विनंती केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यालय अधीक्षक अतिश ससाणे यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणारी ज्येष्ठ नागरिक अधिनियम व मुख्यमंत्री वयोश्री योजना तसेच मुख्यमंत्री तिर्थ दर्शन योजेनेचा लाभ घेण्याचे पात्र लाभार्थ्यांना आवाहन करण्यात केले. कार्यक्रमास परिसरातील इतर ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. असे सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ६१५ प्रकरणे निकाली

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव प्रणिता भारसाकडे-वाघ यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाने निर्देशित केल्यानुसार जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा वकील संघ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय लोक अदालतीचे रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एकुण ६१५ प्रकरणे निकाली निघाली. तर तडजोड रक्कम ७ कोटी ९५ लक्ष ५६ हजार ९६९ रुपये एवढी रक्कम जमा झाल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव प्रणिता भारसाकडे-वाघ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली.

राष्ट्रीय लोक अदालती मध्ये प्रलंबित दिवाणी व फौजदारी प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, तसेच धनादेश अनादर संदर्भातील प्रकरणे, विद्युत प्रकरणे, बँकेची प्रलंबित व दावा दाखलपुर्व वसूली प्रकरणे, कौटूंबिक वादाची प्ररणे, बी.एस.एन.एल.ची दावा दाखल पुर्व प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली. या लोक अदालतसाठी जिल्ह्याच्या मुख्यालयी ८ पॅनल ठेवण्यात आले होते. त्यावर पॅनल प्रमुख म्हणुन सर्व न्यायाधिशांनी तर पॅनल सदस्य म्हणुन विधिज्ञांनी काम पाहिले. लोक अदालती मध्ये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष वर्षा मोहिते, जिल्हा न्यायाधीश ए.जी. जोशी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव प्रणिता भारसाकडे-वाघ तसेच सर्व न्यायाधिश, पॅनल सदस्य व न्यायालयीन कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

कौटुंबिक न्यायालय, जालना येथील राष्ट्रीय लोक अदालती मध्ये एकुण २७ प्रकरणात सन्मानजनक तडजोड होऊन प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यामधील ३ प्रकरणातील जोडप्यांनी परस्परांमधील वाद सामंजस्याने मिटवुन घटस्फोटाचा मार्ग सोडुन पुन्हा संसार करण्याचा निर्णय घेतला. तसेच पक्षकांराच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे सदरचे राष्ट्रीय लोक अदालती मध्ये जास्तीत-जास्त प्रकरणे निकाली निघाले. पॅनल सदस्य म्हणुन विधीज्ञांनी, सरकारी अभियोक्ता यांनी काम पाहिले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातील व न्यायालयीन सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेत लोकअदालत यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले असल्याचेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी पीक कापणी प्रयोगाची आवश्यकता - आ. लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** पीकांच्या उत्पादनाची आकडेवारी राज्य तसेच केंद्र शासनास अनेक मुलभुत आणि धोरणात्मक बार्बीसाठी आवश्यक असते. महाराष्ट्र राज्यामध्ये पीकांच्या उत्पादनाचे पीक कापणी प्रयोग राबविण्यात येतात.महसुल विभागाकडून पैसेवारी ठरविण्यासाठी ग्रामपंचायतनिहाय स्वतंत्र प्रमुख पीकाचे पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात कापणी प्रयोग हे मंडळाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महसुल विभागामार्फत घेतले जातात. शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी पीक कापणी प्रयोगाची आवश्यकता असल्याचे देखील लोणीकरांनी यावेळी स्पष्ट केले

तहसील कार्यालय मंठा येथे आयोजित विविध शासकीय विभागांच्या विकास कामांच्या आढावा बैठकीदरम्यान श्री लोणीकर बोलत होते यावेळी पीक कापणी प्रयोग सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्यमंत्री ग्रामसडक योजना वॉटर ग्रीड सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना शबरी आवास योजना रमाई आवास योजना प्रधानमंत्री आवास योजना मोदी आवास योजना संजय गांधी निराधार योजना विश्वकर्मा योजना यासह इतर महत्त्वपूर्ण विषयांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की दरवर्षी मंडळातील एकूण गावांपैकी २० टक्के गावे रॅण्डम पध्दतीने निवडली जातात. मंडळातील सर्व गावांची ५ वर्षात निवड केली जाते. निवडलेल्या गावात गतवर्षी घेण्यात आलेल्या पीकांची माहिती संबंधित मंडळ अधिकारी यांच्याकडून घेण्यात येते. पीक कापणी प्रयोगासाठी अंतिम केलेली गावे जिल्हास्तरीय पीक कापणी सनियंत्रण समितीने, तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्यामार्फत क्षेत्रीय कर्मचारी यांना सोबत घेऊन कापणी प्रयोग केला जातो. पीक सर्वेक्षण, प्रधानमंत्री पीक विमा योजना व पैसेवारी करिता सर्वसामवेशक पीक कापणी प्रयोग अत्यंत महत्त्वपूर्ण असून पैसेवारी ठरविण्याकरिता राजस्व निरीक्षक अथवा तत्सम अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतवार प्रत्येक प्रमुख पीकांचे किमान ६ पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत महसूल मंडळ/मंडळ गटस्तरावर १२ व तालुकास्तरावर १८ पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात. तसेच, विमा अधिसूचित नसलेल्या पीकांसाठी संबंधीत जिल्ह्यातील पेरणी क्षेत्रानुसार किमान २४ पीक कापणी प्रयोग घेण्यात येतात. अशी माहिती देखील यावेळी लोणीकर यांनी दिली.

परतुर व मंठा तालुक्यातील वॉटर ग्रीड हे अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून सर्वसामान्य नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे यासाठी अत्यंत अथक परिश्रमातून या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे त्याबाबत कंत्राटदार काम करण्यास मागील काळात टाळाटाळ करत असल्यामुळे प्रतिदिन ३० हजार रुपयांचा दंड देखील कामांमध्ये दिरंगाई केल्याबद्दल लावण्यात आलेला आहे दिवाळीपर्यंत परतूर मंठा व जालना ग्रामीण तालुक्यातील परतुर विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या गावांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी पोहोचेल असा विश्वास देखील लोणीकरांनी व्यक्त केला असून जर कंत्राट दराने यापुढे देखील कामात कुचराई केली तर १ लाख रुपये प्रति दिन याप्रमाणे दंड आकारण्यासंदर्भातच्या सूचना देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या जालना जिल्हा कार्यकारी अभियंता श्री गाडे यांना लोणीकरांनी दिल्या.

मतदारसंघातील प्रत्येक गोरगरिबाला स्वतःच्या हक्काचे घर मिळावे यासाठी आपण यापूर्वी देखील सातत्याने प्रयत्न केले असून यापुढे देखील प्रयत्नशील राहणार असल्याचे लोणीकरांनी या आढावा बैठकीदरम्यान स्पष्ट केले या पंचवार्षिक मध्ये सन २०१९-२० पासून आज पर्यंत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३४९६ रमाई आवास योजना अंतर्गत २४५७ शबरी आवास योजना अंतर्गत १४० यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अंतर्गत ६३२ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना अंतर्गत ४५२ मोदी आवास योजना ३१७ अशा एकूण ७४९४ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत आवास योजना अंतर्गत १०११ पुण्यश्लोक अहिल्यादेवी आवास योजनेअंतर्गत २९२ असे एकूण १३०३ प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीसाठी पाठवण्यात आले असून आचारसंहिते पूर्वी त्यांना मान्यता मिळेल असा विश्वास देखील आमदार लोणीकर यांनी यावेळी व्यक्त केला.



दर्जेदार रस्ते व पुलांसाठी मागील दोन वर्षभरात सार्वजनिक बांधकाम विभागाचे २१५.५० कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली असून त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत उर्वरित कामे या वर्षभरात पूर्ण होतील असेही यावेळी विभागाच्या वतीने आढावा बैठकीमध्ये स्पष्ट करण्यात आले तर मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मागील वर्षभरात सुमारे १०२.०५ कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी मंजूर करण्यात आला असून ही कामे देखील पूर्ण झालेली आहेत नव्याने मंजूर करण्यात आलेल्या डांबरीकरण रस्त्यांचे काम पुढील सहा महिन्यात पूर्ण होईल असा विश्वास देखील यावेळी विभागाच्या वतीने देण्यात आला प्रसंगी वेळेत काम पूर्ण केले नाही तर कंत्राट रद्द करावे लागेल अशा शब्दात लोणीकरांनी कंत्राटदारांना देखील खडसावले

परतुर विधानसभा मतदारसंघात एक लाख पेक्षा अधिक माता-भगिनींना लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभ मिळाला असून अंगणवाडी कार्यकर्ता सह प्रशासन लोकप्रतिनिधी कार्यकर्त्यांमुळेच ही योजना यशस्वीरित्या पूर्ण होऊ शकली त्याचप्रमाणे अनाथ बालकांना आधार देण्यासाठी सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना शासनाच्या वतीने सुरू असून या योजनेअंतर्गत अनाथ बालकांना २२५० रुपये प्रति महिना मदत केली जाते त्यामुळे अनाथ बालकांचे आशीर्वाद घेण्यासाठी व त्यांना आधार देण्यासाठी सर्वांनी बालसंगोपन योजना देखील यशस्वीरित्या राबवावी असे आवाहन यावेळी लोणकर यांनी केले.

यावेळी आढावा बैठकीसाठी सतीश राव निर्वळ कैलासराव बोराडे विठ्ठलराव काळे विलास घोडके गणेश राऊत चव्हाण प्रसादराव गडदे नरसिंग राठोड संजय गायकवाड रामकिसन बोडके तानाजी शेंडगे तहसीलदार सोनाली जोंधळे गटविकास अधिकारी गगनबोणे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे उपअभियंता मस्के सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता निवारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता गाडे नवनाथ खंदारे पंजाबराव पुणेकर विठ्ठलराव कदम कैलास चव्हाण प्रल्हादराव सरकटे नारायण राठोड जगदीश जाधव प्रभाकर वरकड सुनील नागरे बाळासाहेब तर नवनाथ चट्टे सूर्यकांत जाधव सोपान वायाळ शिवशंकर डोईफोडे गणेश दवणे जितेंद्र सरकटे संतोष बोराडे भागवत पोटे मनोज देशमुख गौतम खरात विष्णू गायकवाड नायबराव कोंडके आदित्य केंदळे भीमराव खंडारे सुधाकर जाधव नारायण कणसे प्रभाकर चव्हाळ भरत चव्हाळ उद्धव पुणेकर अशोक आप्पा सोनटक्के शरद मोरे प्रल्हाद चाळक रामेश्वर इंगळे विकास चव्हाण कोंडीराम राठोड सोनाजी जाधव यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी अंगणवाडी कार्यकर्ता यांच्यासह सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सन २०२४-२५ वर्षाची खरीप पिकांची हंगामी पैसेवारी जाहीर - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** सन २०२४-२५ या वर्षाच्या खरीप हंगामात खरीप गावांची तसेच ज्या रब्बी गावांत दोन तृतीयांश पेक्षा जास्त खरीपात पेरणी केलेली आढळली आहे, त्या गावांची पैसेवारी देखील खरीप हंगामात जाहीर करण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार जालना जिल्ह्याच्या आठ तालुक्यातील खरीप पिकांच्या सुधारीत अंतिम पैसेवारीमध्ये खरीप गावे एकूण ५१५ व रब्बी गावे ४५६ अशा एकूण ९७१ गावांची खरीप हंगामी पैसेवारी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जाहीर केली आहे. जिल्ह्यातील ९७१ गावांपैकी ५० पैशापेक्षा कमी ३७३ गावे तर ५० पैशापेक्षा जास्त ५९८ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. तर परतूर तालुक्यातील राणी वाहेगाव हे गाव पूर्णतः निम्न दुधना प्रकलपाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे त्या गावाची पैसेवारी जाहीर करण्यात आलेली नाही. ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. जालना तालुका - १५१ गावे, बदनापूर-९२, भोकरदन-१५७, जाफ्राबाद-१०१, परतूर-९७, मंठा-११७, अंबड-१३८, घनसावंगी-११८ गावांचा समावेश आहे. परतूर तालुक्यातील एकूण ९८ गावांपैकी राणी वाहेगाव हे एक गाव बुडीत क्षेत्रात गेलेले असल्यामुळे ९७ गावांची अंतिम पैसेवारी जाहीर करण्यात आलेली आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.